नि.क्र.१२/क

सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ ची जबानी
मी या व्दारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो कीः

| | |
|---|---|
| माझे नाव | - सुरेश विश्वनाथ कदम, |
| वय | - ४१ वर्षे, |
| व्यवसाय | - आय.आर.बी. रोड पेट्रोलिंग, |
| राहणार | - रीस, मोहपाडा, ता. खालापूर, जि. रायगड. |

**सरतपास सरकारी वकील श्रीमती पी. टी. बुये यांचे मार्फत शपथेवर सुरु....**

१) मी पुणे - मुंबई एक्सप्रेस हायवे वर आय.आर.बी. कंपनी मध्ये रोड पेट्रोलिंगचे काम करतो. त्यासाठी माझ्याकडे जिप क्र. एम.एच. १२ के.एच. ७४६७ ही असून त्या जीपवर मी चालक म्हणून काम करतो. दि. १५/०४/२०२३ रोजी संध्याकाळी १९:०० ते दि. १६/०४/२०१९ रोजी सकाळी ०७:०० वाजेपर्यंत मला मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवे वर पेट्रोलिंग ड्युटी होती. दि. १६/०४/२०२३ रोजी पहाटे ०३:०० वाजण्याच्या सुमारास आय.आर.बी. कंट्रोल लोनावळा येथुन तानाजी कदम सुपरवायझर यांचा फोन आला व त्यांनी मला फोनवर कळवले की, मुंबई पुणे एक्सप्रेस हायवेवर कि.मी. क्र. ३४/०० वर पुणे लेनवर एच.पी. पेट्रोल पंपाजवळ अपघात झालेला आहे. कि. मी. क्र. ३४/०० जवळ लेनवर इंडीयन ऑईल व एच.पी. असे दोन पेट्रोलपंप आहेत. तसेच मला फोनवर अपघाताच्या ठिकाणी मदतीसाठी जा असे कळवण्यात आले त्यानंतर मी व तानाजी कदम असे जीप घेवून अपघात झालेल्या ठिकाणाजवळ आलो. तेथे गेल्यावर आम्हाला एका पादचारी इसमाला धडक दिल्यामुळे तो रस्त्याच्या बाजुला पडलेला दिसला. त्या पादचारी इसमाच्या डोक्यास दुखापत होवून रक्त येत होते. त्यामुळे आम्ही आय.आर.बी.च्या रुग्णवाहीकेतून जखमीला उपचारासाठी खोपोली नगरपरीषद हॉस्पीटल येथे पाठवले. त्या पादचारी इसमाला एका एक्स.यु.व्ही. कारने धडक दिली होती. मला कारचा नंबर आठवत नाही. कार चालकाचे नाव हुसैन काचवाला असे होते. जखमीचे नाव चंद्रकांत तारळेकर असे होते. त्याच्या सोबत अजुन एक व्यक्ती होता. मला त्याचे नाव सांगता येणार नाही. त्यानंतर मला जखमी व्यक्ती

उपचारादरम्यान मयत झाल्याचे समजले. पोलिसांनी माझ्याकडे चौकशी केली होती. माझा जबाब नोंदवला होता. कार चालकाला पाहील्यास मी ओळखू शकतो. कार चालक आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास संपला.**

**<u>उलटतपास आरोपीचे वकील श्री. आर. एस. जाधव यांचेमार्फत सुरु...</u>**

२) हे म्हणणे खरे आहे की, पेट्रोलिंगसाठी रवाना होण्यापुर्वी रजिस्टरला नोंद करावी लागते. मी त्या नोंदीचा उतारा तपासादरम्यान पोलिसांना दिला नव्हता. त्या नोंदीचा उतारा पोलिसांनी देखील मला मागितला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, आय.आर.बी. डेल्टा फोर्स ही शासकीय संस्था नाही. हे म्हणणे खरे आहे की, मुंबई पुणे एक्सप्रेस हायवे वर पादचारी व्यक्तिंना प्रवेश नाही. हे म्हणणे खरे आहे की, तेथे दुचाकी वाहनांना देखील प्रवेश नाही. हे म्हणणे खरे आहे की, अपघात मी प्रत्यक्ष पाहीलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी अपघात झाल्यानंतर घटनास्थळावर गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी घटनास्थळावर जाण्यापूर्वी पोलिस तेथे आले होते. हे म्हणणे खरे आहे की, मला पोलिसांनी धडक देणा-या कार चालकाचे नाव सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, कार बद्दल माहिती देखील मला पोलिसांनी सांगितली होती. पोलिसांनी माझ्यासमक्ष त्या ठिकाणी इतर कोणतीही चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला मी घटनास्थळावर पाहील्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास संपला.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत.**

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2026.01.17 14:07:38 +0530

( डी. एस. खोत )
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
कोर्ट क्र.२, खालापूर.

स्थळ - खालपूर.
दिनांक - १७/०१/२०२६